रे.दि. मु. नं. ९१/२०१५

निशाणी – १३१ लगत

**<u>प्रतिवादी नं. ३ चा उलटतपास वादीतर्फे वकील श्री.ए.बी.मदने यांचे मार्फत शपथेवर सुरु.</u>**

**१२.** हे खरे की, माझे मुळ गांव वांगी आहे. हे खरे की, गेली काही वर्षे मी भिलवडी येथे राहतो. साक्षीदार सांगतात गेली २ ते ३ वर्षापासुन मी भिलवडी येथे राहतो. हे खरे की, प्रतिवादी क्र. २ माझे थोरले भाऊ आहेत. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ ने दाव्यात कैफियत दिलेली नाही व मला त्याच्या वतीने साक्ष द्यायचा अधिकार देखील दिलेला नाही. हे खरे नाही की, मी माझा जबाब माझे एकटयासाठी देत आहे. हे खरे की, मला जबाब देण्याकरीता मुख्यत्यारपत्र दिलेले नाही. हे खरे की, वांगी येथील गट नं. २४७८ हा उत्तरेस तर २४७९ हा दक्षिणेस आहे. हे खरे की, या मिळकतीमधुन दक्षिणेकडुन उत्तरेकडे ताकारीचा कॅनॉल गेला आहे. हे खरे नाही की, या दोन्ही मिळकतींच्या मध्ये पुर्वीपासून दक्षिणोत्तर एक बांध आहे. हे खरे नाही की, तेथे आता दोन्ही मिळकतीमधुन बांध आहे. साक्षीदार सांगतात तेथे उत्तर व दक्षिण बांध आहे. हे खरे की, बांधामुळे गट नंबर २४७८ व २४७९ चे दोन भाग झाले आहेत. त्यातील एक भाग पुर्वेकडे व एक पश्चिमेकडे आहे. हे खरे की, गट नं. २४७९ हा दक्षिणेस आहे. हे खरे की, गट नं. २४७९ मधील पश्चिमेकडील भाग प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिपक दिलीप सुर्यवंशी यांना खरेदी दिला आहे. हे खरे नाही की, गट नं. २४७९ मधील दिपक सुर्यवंशी यांना दिलेल्या क्षेत्राच्या पुर्वेकडील भाग माझे वहिवाटीस होता. हे खरे नाही की, तो पुर्व बाजुचा भाग मी पोतदार यांना दिला. गट नं. २४७९ च्या पुर्व भागात

असलेली विहीर वादी क्र. ४ ने काढलेली आहे. हे खरे नाही की, ती विहीर पाण्याची आहे. विहीरीची मोजमापे सांगता येतील का या प्रश्नाला साक्षीदाराने ती विहीर पुर्ण नाही असे उत्तर दिले. विहीरीची खोली १५ फुट आहे. गट नं. २४७९ मध्ये वादी क्र. ३ ने विहीर काढली आहे. ती विहीर १० ते १५ वर्षापूर्वीची आहे. हे खरे नाही की, त्या विहीरीवर वादी क्र. ३ ने विज कनेक्शन घेतले आहे. हे खरे नाही की, वादी क्र. ३ ने त्या विहीरीपासून गट नं. २४७८ पर्यंत पाईपलाईन केलेली आहे. हे खरे नाही की, वादी क्र. ३ व ४ त्यांच्या क्षेत्रात बागायती पिके घेतात. साक्षीदार सांगतात सोयीनुसार आमची त्या मिळकतीमध्ये वहिवाट आहे. हे खरे नाही की, सोयीनुसार असलेल्या क्षेत्रात वादी क्र. ३ व ४ यांनी ऊस पीक केलेले आहे. हे खरे की, वादी क्र. ३ ने विहीर पाडताना आम्ही कोणीही हरकत घेतलेली नाही.

१३. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ चे घर गट नं. २४७८ च्या पश्चिमबाजुच्या कोप–यात आहे. साक्षीदार सांगतात त्यांचे घर दक्षिणेला आहे. हे खरे की, दिपक दिलीप सुर्यवंशी यांना जे खरेदीपत्र करुन दिले ते चतुःसिमापूर्वक करुन दिले. हे खरे की, गट नं. २४७९ मध्ये पुर्वेला वादी क्र. ३ चे घर आहे. ते घर त्यांनी २० वर्षापूर्वी बांधले आहे. हे खरे की, ते घर बांधताना वादी क्र. ३ ला कोणीही हरकत केलेली नाही. प्रतिवादी क्र. १ ने गट नं. २४७८ मध्ये पश्चिम बाजुला विहीर पाडलेली नाही. हे खरे की, गट नं. २४७८ च्या पूर्वबाजुने वांगी रस्ता गेलेला आहे. हे खरे की, गट नं. २४७८ मध्ये पूर्वबाजुला दोन दर्गाच्या इमारती आहेत. हे खरे नाही की, गट नं. २४७८ मध्ये एक बोअर आहे.

**वादीतर्फे वकीलांच्या तोंडीविनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब...**

श्रवणोत्तर स्वीकृत

दिनांक – १७/०१/२०२३.

सह दिवाणी न्यायाधीश, कडेगांव